
१५५६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ९३००

# पाकळ्या



REFBK-0009095
REFBK-0009095

भाऊ मांडवकर

# पा नो ळ्या

[ कवितासंग्रह ]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 20000 वि: कविता
क्रमांक 93४४ नों: दि:

भाऊ मांडवकर

REFBK-0009095
REFBK-0009095

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८६५

सेवा प्रकाशन
नागपूर

मूल्य अडीच रुपये

सर्वाधिकार कर्त्याकडे

प्रथमावृत्ति : १९५६

मुद्रक: किसनलाल मुंदडा,
गुरुदेव मुद्रणालय,
महाल, नागपूर क्र. २.

प्रकाशक: सेवा प्रकाशन,
झेंडा चौक, महाल, नागपूर.

# 'पानोळ्यां'ची लज्जत चाखण्यापूर्वी—

★

मोहाच्या झाडांचीं फळें वाळवून त्याच्या भाकरी खेडूत लोक पावसाळ्यांत करतात. वऱ्हाडी खेड्यांतील गरीबगुर्‍यांना पुरणाच्या पोळीचा सण आवडत असूनहि तो मिळणें कठीणच ! तेव्हा पुरणाच्या पोळीचा पर्याय म्हणजे पानोळ्या. ह्या मोह-फळांच्या भाकरींवर गरीबांच्या घरांतले सणवार साजरे होतात.

माझ्या ह्या 'पानोळ्यां'ना पुरणाच्या पोळीची सर तशी येणार नाही. माझी तशी अपेक्षाहि नाही. ज्या वातावरणाचा अनुभव आला, जें जवळून पाहतां आलें त्याचें चित्रण करण्याची हाव होती. ग्रामीण वातावरणावरच्या माझ्या कवितांची निर्मिति कांहीशी हौस, कांहीशी तळमळ व कांहीसा अभिमान यांतून झाली.

या संग्रहामधील कांही कवितांतील कांही भाग मला स्वतःला आज तितकासा आवडणार नाहीं. माझ्या दोषांची मला जाणीव आहे. असें असूनहि हा संग्रह या स्वरूपांत बाहेर यावा म्हणून आत्मीयता, आपुलकी आणि जिव्हाळा असणाऱ्या माझ्या सुहृदांनाच माझ्यापेक्षा जास्त घाई झाली ! अर्थात् ही त्यांची ' घाई ' जवळिकेंतून निर्माण झाली हें मी विसरूं शकत नाहीं. माझ्या मित्रमंडळीचा आग्रह नसता तर मी माझा काव्यसंग्रह छापण्याचा विचारहि केला नसता.

काव्यसंग्रहाचें प्रकाशन बहुधा कवीच्या समाधानासाठी असतें. काव्याच्या पुस्तकांना खप नसतो हाहि अनेकांचा अनुभव आहे. मला या बाबतींत मात्र पूर्ण समाधान आहे. माझ्या ह्या ' पानोळ्या ' प्रकाशित होण्यापूर्वींच पुस्तकाचा खर्च निघाला आहे. आगाऊ मागणीमुळेच पुस्तक इतक्या लवकर निघूं शकलें.

'पानोळ्यां'ना प्रस्तावना नसल्यामुळे कांही वाचकांचा कदाचित् विरस होण्याचा संभव आहे प्रस्तावनेचें ओझें नसल्यामुळे मात्र कांही वाचकांना आनंद होईल. स्वतंत्ररीत्या कवितेंतली खुमारी आणि गोडी अनुभवण्यांतहि एकप्रकारचा आनंद असतो

'पानोळ्या'वरील मुखपृष्ठाचें चित्र चित्रकार श्री. मनोहर यांनी विनामूल्य काढून दिलें. त्यांची ही आपुलकी मी कधीच विसरूं शकणार नाहीं.


छपाई चांगली व्हावी म्हणून गुरुदेव मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. किसनलाल मुंदडा यांनी अतिशय श्रम घेतले.

श्री. जी डी. निकम यांनी तर कोणत्या बाबतींत मदत केली नाही, हाच प्रश्न आहे. प्रत्येक बाबतींत त्यांच्या आणि श्री. रामचंद्र कोडापे यांच्या प्रेमळ सहानुभूतीने मीं या बाबतींत पाऊल उचलत आलों आहे. माझे मित्र श्री. रामदास सेलूकर यांच्या व्यक्तिगत मदतीचा अनुल्लेख करणें अन्यायाचें होईल.

माझ्याबद्दल आत्यंतिक सहानुभूति दाखवून 'पानोळ्या' प्रकाशांत आणण्यासाठी हस्तें-परहस्तें, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष अशी ज्यांनी ज्यांनी मला मदत केली, त्या सर्वांबाबत अंतःकरणापासून कृतज्ञता व्यक्त करणें मी आपलें कर्तव्य समजतों.

नागपूर,
दि. १०-३-१९५६

नम्र,
**भाऊ मांडवकर**



# —: अनुक्रम :—


१ पुष्पवाटिकेंत १
२ सौख्याचे क्षण २
३ पावसाळी शेत ३
४ लेखकाचा शोध ४
५ थे आणि येथे ५
६ गोवनाची दिवाळी ६
७ वेषधारी बुवास ८
८ आम्हां गरीबांना १०
९ साजुनी ११
१० शेतकऱ्यांचें गर्वगीत १३
११ माझ्या वावरांत १४
१२ देशभक्ता १५
१३ शंकर माझा शेतकरी १६
१४ निर्मा नवरचना १८
१५ दारिद्र्याचें अवगुंठन २०
१६ तळीचें गाणें २१
१७ कृषकांचें गाऱ्हाणें २२
१८ किसानास हाक २४
१९ कमावणारा शेतकरी २५
२० शंका सर्व मानवांस २६
२१ माझ्या मळ्यावरोनिया २७
२२ नव्या युगाच्या नव्या कुमारा २८
२३ दसऱ्याचें सोनें २९
२४ सेवा ३१
२५ नव्या उमेदी अन् आशा ३२
२६ आस ३३
२७ तुझ्यामाझ्या मीलनाची ३४
२८ चढूं या चला उन्नतीचागिरी ३५
२९ 'च्या' ची तल्लप करते घाई! ३६
३० मीलन! मीलन!! ३८
३१ ओढ दोन्हींचीं कां? ४०
३२ जगांत उलटी रीत चालते! ४१
३३ कुणी न माझें! मी न कुणाचा!! ४२
३४ ब्रह्म थाळींत ठाकलें! ४५
३५ पांत ४६
३६ तुझ्या वक्षस्थळावर ४७
३७ भिकार–जेवण ४८
३८ माझा सुखाचा संसार ४९
३९ मुक्तात्मा ५०
४० तुला तेथ मी पाहतों ईश्वरा ५१
४१ सेवकाचें हृद्‌गत ५३
४२ वेळवाच्या राजींतला ५४
४३ तुला न माझी कळेल कविता ५५
४४ प्रेमकहाणी ५६
४५ येथेच तूं येशील ना? ५७
४६ पुरांत पडले दोन ओंडके ५८
४७ कळुं तर दे मज माव तुझी ५९
४८ सुकृत ६१
४९ पावसांत ६२
५० स्वराज्य आलें ६३
५१ गर्द सावली पंख पसरते ६४
५२ काजळलेले पंख ६५
५३ महानतेच्या मुळांत शिरुनी ६६
५४ विश्वनाथ मी! ६७
५५ शिवारांतली शांती ६८

‘पानोळ्यां’वर सणवार
साजरा करणाऱ्या
ग्रामीणांना-

# १. पुष्पवाटिकेंत

पुष्पवाटिकेंत फुलें अनुपम
फुलतीं बेफाम इतस्ततः

रंग, गुण, वास तयांचा विभिन्न
बघतांचि मन उचंबळे

नाक मुरडते सान सदाफुली
बघते बकुळी लवूनिया

पारिजातकाचा गंध दरवळे
समीराशीं खेळे चाफा कैसा !

कुसुमांचा राजा कटकीं गुलाब
नाचे लगबग फांदीवरी

शेवंती ही अशी लपे कां भुईशीं ?
खेळे चमेलीशीं लपंडाव

उंचावोनी मान डोकावी मोगरा
जिवाचा सहारा दुःखितांच्या

अति दुःखावेगें मन होरपळे
जग हें सगळें तुच्छ वाटे

बागेमाजीं तें मी सहजचि जातों
मना शांतवितो अणूरेणू

फळंब, २४.३.४८

ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८०९४
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम २० ६६० दि: ३.५९
क्रमांक ... नों: दि:

## २. सौख्याचे क्षण

उद्यानीं फुलती असंख्य कलिका
तशाच आकाशि या
स्वच्छंदें करिती मजा बघ कशा
हासूनिया चांदण्या
रात्रीं इंदुहि देत मोद जगता
लोपे प्रभातीं क्षणीं
सौख्याचे क्षण गोड निर्मल असे
ना नित्य भोगे कुणी !

नागपूर, ३.७.४८

## ३. पावसाळी शेत

पावसाळ्यांत । ये छान मौज शेतांत

वखरालागी बैल जुंपुनी
सुरूं जाहली वघा पेरणी
कृषिवल हर्षें गाती गाणीं
स्त्रियांची साथ । ये छान मौज शेतांत

सुरुसुरु सरकी सरत्यामधुनी
सुटतांना जणुं गाते गाणीं
'कुहू कुहू' हे शब्द काढुनी
कोकिळा गात । ये छान मौज शेतांत

निदण जेव्हा बाया करती
गीतें गाती, कथा सांगती
पैसे घेउनि तासावरती
घरासी जात । ये छान मौज शेतांत

उघाड असतां चाले डवरा
झडित आटती दोरकासरा
अथवा बैलांसाठी चारा
करी पडितांत । ये छान मौज शेतांत

नेसुनि धोतर गुडघ्यावरती
खांदीं कांबळ, काठी हातीं
काळिसावळी किसानमूर्ति
खपे दिनरात । ये छान मौज शेतांत

नागपूर, ७.८.४८

# ४. लेखकाचा शोध

आहे लेखक कोण थोर म्हणुनी गेलों बघाया जनीं
घालीलें घर पालथें प्रति परी नाही मिळाला कुणी
गावाचा मग वीट फार मज ये, खिन्नावलों मी मनीं
वस्तीला त्यजुनी उगीच निघलों पाहायला त्या वनीं

पाहीले वनिचे विशाल तरु नी उत्तुंग शैलें तशीं
खोऱ्यांतील बहू गुहा बघितल्या, धुंडाळले ते ऋषि
मोठाल्या सरिता वऱ्याच बघुनी ना शांति लाभे मना
तेथेंही बनुनी निराश मग मीं सोडीयलें त्या वना

येतांना पथि एक शेत बघुनी रेंगाळले मत्पद
बैलां जुंपुनिया किसान वखरा गाई मजेने पद
काळ्या कागदिं मातिच्या लिहित तो तासांचिया 'मुद्दणें'
मोठा लेखक हाच जाणुनि मनीं आनंदलों दर्शनें !

नागपूर, १८.११.४८

## ५. तेथे आणि येथे

तेथे आडाच्या वास्तूला
धारा तुपाच्या सोडती
येथे कसुंडीला तेल--
नाही. लेकरें रडतीं १

तेथे दगडी देवांना
दहीदूध बोनें देती
येथे बाळें रोडकीं हीं
मावा आईच्या तोडतीं २

तेथे चांदीच्या कृष्णाला
रोज मधाने न्हाणिती
येथे आजाऱ्याला कधी
दोन थेंब ना मिळती ३

तेथे मांजरांकुत्र्यांना
होतो फराळ मिष्टान्न
येथे माणसांपोरांना
शिळे तुकडे कदान्न ४

तेथे बाहुलाबाहुली
नेसे खण जरीकाठी
येथे बायकांपोरांच्या
लक्तरांना किती गाठी ५

तेथे दररोज मिळे
घोड्यांलागी खाया चणे
येथे उपाशी फाकाया
नच मिळती फुटाणे ६

तेथे मोत्याला धुवाया
तेल साबण विपुल
येथे लटा नहायला
सापडेना एरंडेल ७

नागपूर, ४.१२.४८

# ६. गोधनाची दिवाळी

घराघरांतुनि वत्सल कृषिवल सजवाया गायी
दंग जाहला हर्षभराने गाणींही गाई

साधे वा बिल्लोरी चढवी कवड्यांचे पट्टे
भीति न कांही गायींना अजि मारिल कुणि रट्टे

तोंडांवरती कुणी घालती मोहाड्या छान
झेंडुफुलांच्या घालति माळा वांसरांहि सान

रंगीबेरंगी केसांच्या शिल्या गळ्यामाजी
पाहुनिया वाटे जणुं फुललीं पुष्पें हीं ताजीं

गेरूचे थापे पाठीला उचलून धरतात
शिंगावरचे बेगड चमचम शोभा देतात

शिंगऱ्या गायीच्या शिंगावर मोरपिसाऱ्याची
बघुन कुचाटी द्यावी वाटे उपमा कृष्णाची

झुली छानशा झोकदार त्या शोभतात पाठीं
खरेंच पाहिल खास खालती इंद्राचा हत्ती !

*

गुरांमागुनी गुरें सुटोनी येती मैदानीं
गोप गायकी चाले अपुल्या कळपाच्या मधुनी

गुराखियाच्या खांद्यावरची कांबळ मीठाची
गायकावु ती काठी पाडी मना मोह साची

वाजासैनीच्या तालावर पैंजण पायींचे
वाजवुनीया गायी दावी प्रकार नृत्यांचे

तिरिप उन्हाची झुलींस मिळतां लखलखती फार
कोलामांचे पाउल डफ करतात मना गार

गायींचा तर हर्ष अनावर धावतात स्वैर
कालवडी त्या छोटचा तैशा उडती चौखूर

दंडारीही त्यांतच पुन्हा हर्षीं भर घाली
जिकडेतिकडे दिसते सारी धूमधाम मचली

*

जागोमामा हौस म्हणोनी पाळि एक गाय
करितो सेवा सदा शरीरें समजोनी माय

या दिवसाला सजवुन तिजला साजाबाजाने
अंगावरची म्हणुन मिठाने भरवी हाताने

नाईकांच्या डफांमागुनी नाचत थयथय्य
नेतो प्रेमें हासतहासत एकच ती गाय

हरी शेळकी शेळचा अपुल्या खेळाया नेतो
सोमा म्हसकी म्हशी आपुल्या न्याया नच भुलतो

रामा धनगर मेंढचांना दिपवाळी बघण्याला
करी मोकळा भुलेल कैसा शृंगारायाला ?

*

बघण्या उत्सव मौजेचा हा उभ्या जागजागीं—
सस्मित ललना; फुलल्या कलिका जणूं काय बागीं

नैसर्गिक ही नित्य दिवाळी बघुं देवो ईश !
कृत्रिमतेचा जींत न कोठे मुळीच लवलेश !!

कळंब, ११.१२.४८

# ७. वेषधारी बुवास

हें ढोंग कशाला करतो—घेउनी मण्यांची माळ
घरघरीं रिकामा फिरुनी—गमवितो उगाची काळ
बहुमोल रम्य आयुर्ष्यो—निर्मि कां रुक्ष खडकाळ ?
लांबुळा टिळा भाळाला
घालुनिया माळ गळ्याला
वाउगा भार शरिराला
करुनिया कासया घेतो ?

डोक्यास जटांचा भार—कां उगिच तेल खर्चाया ?
मनगटीं कडे घाली कां—कामाला अडचण व्हाया ?
कां घाली लुंगी, कफनी—ध्वज भगवा अपमानाया ?
फासतो राख अंगाला,
खर्चितो व्यर्थ कां तिजला ?
जर उरली तर शेताला—
खत देण्या ये उपयोगी

ती कुबडी अथवा दंडा—इंधनांत दे फेकोनी
श्रमिकास कमंडलु तो दे—तोषेल पिवोनी पाणी
ती खडावु, झोळी आता—दोन्हीहि टाक जाळोनी
सोडोनी भिक्षांदेही
त्यागुनी ढोंगधतुऱ्यांहि
उद्योग क्षणीं कर कांही
जनतेचा प्यारा होई

सत्‌-शब्द मण्यांची माळ--सेवेचा टिकला भालीं
सद्‌बुद्धि जटा वाढवुनी—सुविचार तेल तिज घाली
कार्याचें कंकण हातीं--लुंगी ती त्यागाचि भली

करुनिया राख स्वार्थाची
ज्ञानदंड घे हाताशीं
मुखतुंब्यांतुनि पाण्याची
—कार्यबोध– सोडी धार

ते खडावु धैर्याचे घे—प्रेमास्तव झोळी पसरी
'राष्ट्रधर्म' निर्मायाला--घरघरीं घाल मम फेरी
'साधुत्व' यावया अंगीं--कर राष्ट्रीं सेवा-वारी

साधाच अंगिचा वेष
हृदयांत एकची ध्यास--
'वर येईल कैसा देश ?'
...बसुं नको, लाग कामाला !

कळंब, १९.१२.४८

# ८. आम्हां गरीबांना

आम्हां गरीबांना
तलाव दर्पण
रूप पाहूं पूर्ण

आम्हां गरीबांना
बिछाना तणस
सुखवी तनूस

आम्हां गरीबांना
पानोळ्यांचा सण
तोषवितो मन

आम्हां गरीबांना
कांदा हेंच तूप
तेजाळवी रूप

आम्हां गरीबांना
नित्याचा आराम
करितांना काम

आम्हां गरीबांना
पोशाख खादीचा
हाताच्या सुताचा

कळंब, २२.१२.४८

# १. साजुनी

आज असे साजुनी
वावरीं, आज असे साजुनी

बाया उठुनी भल्या पहाटीं
तयार करती तूप नि रोटी
गूळ सेवया वरतुनि देती
खोळ घेतसे कुणी…

नवा करविला वखर जुंपती
नवेंच दमणें त्यास घालती
कासरकेही नवेच असती
वस्तु नको मुळि जुनी…

बैलांचा तर साज निराळा !
कपाळावरी मणके, माळा
गळयांत तोडे, पायीं वाळा
झूल दिसे शोभुनी…

झुमझुम खेटत मग औताला
किसान नेतो तो शेताला
पांच मुठ्ठुणें झुंजुरक्याला—
म्होतिर करि हाणुनी…



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २०११० दि.
क्रमांक ... नों. दि.

औताबलां शेंदुर लावी
बाळुनि कापुर सकळा दावी
खतदेवां नच भुलुनि जाई
वंदित वृषभां गुणी…

शिदोरीस सोडुनी जेवती
बैलांना पण निवद दावती
जेवण होतां पेव भरीती
येत घरा परतुनी…

यांवे येउनि दारावरती
पुजी साजुनी किसानयुवति
बैलजोडिचे चरण धुई ती
हात जोडि साजणी •

कळंब, ७.१.४९

# १०. शेतकऱ्यांचें गर्वगीत

छातिस माती । लावुनिया पिकवूं खेती

आनंदाने रावरावुनी
मशागतीला करुं रात्रंदिनि
काढूं या काळ्या मातींतुनि
माणिकमोती । भरुं कणग्या खंडोगणती

जगास साऱ्या अम्हीच जगवूं
लहानथोरा घालुनि खाऊं
जगण्याची गुरुकिल्ली देऊं
जगाला शांति । आम्हीच लाभवूं अंतीं

कणाकणांतुनिया मातीच्या
जिवंत कस तो निर्मोनीया
लावूं ठणठण त्या बोलाया
मातिच माती । पण कनक करुन दावूं ती

शेती फळवूं, फुलवूं आम्ही
उखिर, उजाड नि ओक्या धामीं
निर्मूं सौंदर्यातें नामी
मरूं त्यासाठी । कच नच खाऊं कल्पान्तीं

अव्हेरो अवघे अम्हांला
घरदारावर घालो घाला
पर्वा त्यांची करा कशाला ?
जगतासाठी । आनंदें होऊं कष्टी !

कळंब, १०.२.४९

# ११. माझ्या वावरांत

माझ्या वावरांत मन माझें रमे
सर्व कांही गमे शेत माझें

तीर्थक्षेत्र हेंच असें मज मोठें
धुंडायला कोठे जावें कां हो ?

गंगा वाहतसे शेजारीं निर्मळ
पवित्र तें जल हिचें मला

वनश्रीच्या पुढे माझ्या वावराच्या
स्वर्गीचा बगीचा तुच्छ मज

नंदीबैल देव गोमाता ही अंबा
कांता माझी रंभा मजसवें

नानाविध पक्षी रिझविती मला
फोनो तो कशाला मग हवा ?

जगीं जें जें आहे तें तें असें येथे
मग कासयातें व्यर्थ हिंडूं ?

कळंब, १७.२.४९

## १२. देशभक्ता

देशभक्ता ! चाल रे खेड्याकडे आता जरासा
राहुं दे येथील व्याख्यानें, सभा, फेऱ्या, जुलूस
लागुं दे वारा तुला ग्रामीणतेचा शीतकारी
हो उभा पारावरी व्याख्यान तेथे द्यावयास

छेड खेडूतांपुढे तूं हृद्‌विणेची तार छान
घे हळू आकर्षुनीया खेडुतांच्या अंतरांस
नागरी लोकांपुढे कां कंठशोषातें करीतो ?
दे दिलासा तेथल्या भोळ्या जनातें त्यापरीस

आर्त हाका ऐक दीनांच्या तिथे तूं चाललेल्या
ना मिळे कष्टूनिया लोकांस कांही खावयास
राबराबे नित्य हाडांचीं करोनी खूप काडें
ना शमे पोटांतल्या ज्वाला, सदा चिंता मनास

अन्न ज्यांचें भक्षितो त्यांची करी सेवा जरा रे !
आपदा त्यांच्या कमी व्हाया करी तूं कार्य खास
देशभक्ताची उपाधी सार्थ व्हावी वाटतें ना ?
लाग खेड्याच्या पथाला सोडुनी स्वार्थादिकास

कळंब, १०.४.४९

## १३. शंकर माझा शेतकरी

शंकर माझा शेतकरी !
शेतीत राबे दिवसभरी

त्रिशूळ तिफणीचा हातीं
जवळच भार्या पार्वति ती
नंदी रत कामांत राहती
जग सुखवाया काम करी
शंकर माझा शेतकरी !

गळयांत गरिबीचे पाश
भुजंग जणुं हे, दे त्रास
तापभसित विलसे भाळास
धगधग वैराग्यास धरी
शंकर माझा शेतकरी !

खायाला कांही न मिळे
सटवीने पोरहि सुकलें
वक्रतुंड लंबोदर झालें
घेई त्याला मांडिवरी
शंकर माझा शेतकरी !

कळण्याचे मोदक हातीं
शिळेच घेउनिया खाती
मौजेमध्ये बाळ गणपति
पाहुनिया त्या शीण हरी
शंकर माझा शेतकरी !

स्मशानवत् गृहिं राहतसे
विरक्तवृत्ती ठेवितसे
कितीक दुःखें जरि साहतसे
दावी हासूं तरी वरी
शंकर माझा शेतकरी !

कळंब, ७.५.४९

# १४. निर्मा नवरचना

निर्मा नवरचना । भारतीं । निर्मा नवरचना
अन् त्यासाठी अंतःकरणें अर्पा निजप्राणा

जातियतेचें भूत भयंकर गाडा मातींत
वेळप्रसंगीं गोळ्या अरिच्या झेला छातींत
पक्षभेद ते त्वरित द्या अता झुगारून दूर
राष्ट्रियतेने प्रतिघटकाचें भरुं द्या हो ऊर
परस्परांच्या गुन्ह्यांस विसरुनि करा त्यांस क्षमा
बंधुनो, करा त्यांस क्षमा । निर्मा नवरचना

प्राची उदया आली घेउनि नवयुगसंदेश
वदते, समाजरचना बदला, वर आणा देश
देशकालस्थितिनुरूप बदला बाहेरिल वेष
तोडा कलहांच्या भिंतींना अणि विसरा द्वेष
अन्न पोटभर मिळो खायला उत्तम सर्वांना
सर्वदा, उत्तम सर्वांना । निर्मा नवरचना

जींत न कोठे मुळीच दिसती छटा विषमतेच्या
जींत वाहती अखंड धारा शांति नि समतेच्या
घेणें देणें नसें फुकाचें, वाद नसे कांही
उच्चनीच श्रीमंतदरिद्री भेद जींत नाही
स्थापित लवकर ही रचना हो! नको कालगणना
व्यर्थची, नको कालगणना । निर्मा नवरचना

स्वार्थाचा बाजार लोपवा, नाशा अंध रुढी
प्रेमभावना हृदिं वाढूं द्या, काढा क्षुद्र अढी
सत्य, अहिंसा उज्ज्वल तत्त्वें जगास सांगाया
पुढती होउनि नित्य झटोनी झिजवा हो काया
नवनव तत्त्वें वदा जगाला उंच करुनि माना
सकलही, उंच करुनि माना । निर्मा नवरचना

प्रतिदिन पृथ्वी धावत आहे वेगाने फार
त्याहुनि वेगें फिरवा अपुल्या प्रगतीचें चक्र
उलथुन टाका जुनी खुरचटी पुराणजनरचना
नवरचनेंतुन बगिचा फुलवा कलमांनी नाना
क्रांति…? कशाला…? …उत्क्रांतीच्या पथास लागाना
अतातरि, पथास लागाना ।
निर्मा नवरचना । भारतीं । निर्मा नवरचना

कळंब, ३१.५.४९

# १५. दारिद्र्याचें अवगुंठन

गांठीचें लुगडें जुनें बहु जया छिद्रें असंख्यात तीं
चोळी फाटुनिया शरीर उघडें दारिद्र्य दावी जना
जातांना पथि नित्य लाज तिचिया वाटे बहू ती मना
डोळेही वरती करून अपुले चाले न केव्हाही ती

दागीना न सुटा कधीच कुणिही अंगीं तिच्या पाहिला
डोकीला नच तेल मौलिक मिळे, लाबी कधी खायचें
कामाला कटिमाजि खोवुनि विळा रानामधें जायचें
नित्याचा क्रम हा करीत असणें हें रोजचेंची तिला

कामाने बनलें शरीर अवघें गोरें तिचें सावळें
कांतीही लपली तिची गरिबिच्या औगुंठनाखालती
होतां यौवनभार फार उठला नी लुप्तसी कांति ती
कोणाचीच तिच्याकडे न बहुधा दृष्टी कधीही वळे

* * *

दैवाने पडली पुढे युवति ती श्रीमंत ऐशा घरीं
रस्त्याने निघतां क्वचीत, नजरा लागे तिचीयावरी !

वर्धा, ७.११.४९

## १६. तळीचें गाणें

विगि विगि चाला राजे हो । जाताहे घात निघून
नारायण वरती आला । वाऱ्यास सवे घेऊन
जोरदार वारा सुटला । टाकुं या तळी उफणून
द्या पाटचा गच्च भरून
सदबा ! तूं सुगरण हाण
मी तिव्यावरी होऊन
सोडीन सरारा दाणे । गाउं रे छानसें गाणें

मोत्यांची पडली रास । मोजण्यास चेडें आणा
पण पूजा करुनी आधी । कापूरऊद बाळा ना !
पोत्यांत जवारी भरुनी । गाडीमधि चढवा त्यांना
ढवळचा-भोंडचा लवकर या
गाडीस घरीं नेऊं या
कणग्या अन् ढोले भरुं या
मालकीण होइल खूष । पूजील घरीं तुम्हांस

कळंव, १५.११.४९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८०८५
ग्रंथ शाखा (ठाणे प्रभा)

# १७. कृषकांचें गाऱ्हाणें

आपत्ति आमुच्या ह्या दावूं तरी कुणास ?
नाही कुणी तयार ऐकून घ्यावयास
लीहून लेख तुम्ही काव्येंहि मोठमोठीं
देतां अम्हां दिलासा आणि प्रणाम कोटी
आम्हांस सर्वदा ही दे त्रास भूक पोटीं
ना गोडधोड लाभे ठेवावयास ओठीं

चित्रें चितारतात आलेख्यकार चित्रीं
मासागणीक आम्ही होतों प्रसिद्ध पत्रीं
का फायदा तयांचा अम्हां अशिक्षितांना
या कोरड्या जिभेने का चाटणार त्यांना ?
या दूरच्या स्तुतीने साराल काय दुःखें !
चाटु प्रसिद्धिसाठी पच्ची कराल डोकें !

'राजे' म्हणून कोणी संबोधतात आम्हां
या दाहण्यास येथे या चंद्रमौळि धामा
बोलांचिया कढीने संपेल भूक कैशी ?
वा कागदी हयांनी होई खुशी कुणाशीं ?
पाण्यावरील फेस हातांत घेतल्याने
ना भागणार तृष्णा फेसाळत्या जलाने

'कर्दा जगांत श्रेष्ठ धंदाहि श्रेष्ठ त्याचा !'
ही बोलघेवड्यांची बोले सदाच वाचा

अंगें कृती कराया    येणार एक नाही
हे अंगचोर अंगा    लावी न झीज कांही
कां धूळ फेकतां हो    दावावया दुजांना ?
ही आत्मवंचना हो    आतातरी त्यजाना !

कळंब, २८.११.४९

# १८. किसानास हाक

स्वातंत्र्याची सकाळ झाली ऊठ किसाना अता
लाग रे लाग उन्नतीपथा
'जुनेंच सोनें'– खुळी कल्पना कवटाळुनि बैसला
म्हणूनच नाश तुझा जाहला
नित लटकत तुजवर दारिद्र्याची गदा
तुज जेर करीती नित्य नव्या आपदा
बहु पाश पाशवी तुला जखडती सदा
अतातरी बाहेर नीघ ना या जौंजाळांतुनी
न राही करकचुनी बंधनीं

शिवारांतल्या शिवेपल्याडिल नवें क्षितिज बघ जरा
विश्व तव समजुं नको वावरा
काळ पलटता पहा पातला तुझ्याचसाठी गड्या !
निसर्गहि इच्छि हेंच बापुड्या !
कां अज्ञतमामधि खितपततो अजुनहि
घे प्रकाशदीपक उजळव सगळी मही
न्यूनताच नच मग कांही तुझिया गृहीं
चालुं घडीशीं अनुकुल बनवुनि घेइ स्वताला स्वता
पुढे चल, राहुं नको मागुता !

कळंव, २८.११.४९

## १९. कमावणारा शेतकरी....

रोज रिकामा दारावर जो असतो बसूनिया भय्या
काडीचेंही काम न करतां पोट फुगेवर त्या खाया

चार अक्षरी सही ठोकतो अधिकारी ऑफीसांत
बाकी सगळा वेळ जातसे सिगारेटच्या झुरक्यांत

आटाळ्यावर पडूनि बोका नित्य घोरतो सुस्तपणें
फराळ त्याचा सदा होतसे सायीने अन् लोण्याने

रिकामपणचे चाळे म्हणुनी नासधूस उंदिर करती
खंडोगणती धान्य सेविती, नाश करीती, कुरतडती

देवळांतले निश्चल धोंडे चूप बसोनी जरि असती
त्यांच्यासाठी पक्वान्नें अन् अठरा धान्यें तीं येतीं

सर्व आळशी कंठित दिसती आनंदामध्ये दिवस
कमावणारा शेतकरी कां रोज काढितो उपवास ?

कळंब, २६.१२.४९

# २०. शंका सर्व मानवांस

कोणाचा न कोणावरी
तिळभरहि विश्वास
'हीच प्रगति विश्वाची?'
शंका सर्व मानवांस

एकीकडे भरतात
शांतिपरिषदा खास
'युद्धाचे कां वारे मग?'
शंका सर्व मानवांस

विश्वबंधुत्वाची करी
ओरड ती सर्व देश
'पण आंतुनि कां द्वेष?'
शंका सर्व मानवांस

येवो जग हें जवळ
वाटतसे सकळांस
'वाढे विषमता कशी?'
शंका सर्व मानवांस

"ध्येय प्रत्यक्षीं न येतें
दिसे कागदीं गोंडस"
'नित्य उक्ति खरी कां ही?'
शंका सर्व मानवांस

कळंब, १५.१.५०

## २१. माझ्या मळ्यावरोनिया

माझ्या मळयावरोनिया
हाकतें मी पांखरांना
पल्याडल्या शेतांतून
ऐकूं येती तुझ्या ताना

माझ्या गोफणीचा गोटा
येतो तुझ्या बांधावर
शीळ तोंडाने घालून
धाडतोस तूं उत्तर

गोफणीने थांबवी मी
किलबिल पांखरांची
थांबवितांहि थांबेना
खळबळ अंतरींची

अलीकडच्या बांधाने
कापतें मी गवताला
पलीकडच्या बाजूने
चारतोस तूं बैलांला

केव्हा पार होईल रे !
दोघांमधील हा बांध
कधी जुळतील सख्या !
दोन हृदयांचे बंध ?

वर्धा, ३१.३.५०

# २२. नव्या युगाच्या नव्या कुमारा

नव्या युगाच्या नव्या कुमारा ! टाक पुढे पाउलें
विश्वाचें हें विशाल अंगण तुझ्याचसाठी खुलें

विहर स्वतेजें महीवरी तूं ठाव तिचा घ्यावया
उन्नत होई प्रकाश नूतन विश्वाला द्यावया

शोध क्षणोक्षणिं अणूअणूमधिं नवीन कांहीतरी
उभार त्यांतुनि नवनव किमया, त्यांतच तव चातुरी

अपुल्यामधल्या शक्ति ओळखुनि अध्ययनें वाढवी
अनंत मौलिक सद्‌गुणरत्नें वपुकोंदणिं बैसवी

सोड निराशा, झाड आळसा, ध्येयपथा आक्रमी
वाटाड्या हो तुझा तूंच, मग तुला कशाचें कमी ?

छोटा मानूं नको आपणा,…मागे कां पाहतो ?
'मिळवीतो जय कुमार नित्यचि' – इतिहासहि सांगतो

वर्धा, ७.७.५०

## २३. दसऱ्याचें सोनें

काळाचा महिमा विचित्र असतो, कोणा न कांही कळे
काळाच्या उदरांत काय लपलें कोणास ना आकळे

या भूमींतच एक काळ बघुनी गेला 'सुवर्णा' खऱ्या
मारामार परी अम्हां अजि पडे पानें मिळाया 'खुऱ्या'

कालौघामधि वाहवीत अपणा नेणें असे वंचना
कांही वेळ परंतु तेंच करणें लागे समष्टीं जना

ह्याला कारण सर्व आपण असूं सामान्यशीं माणसें
ना दिव्य प्रतिभा, अमूप क्षमता सामान्य लोकीं वसे

काळाच्या उलटया दिशेस मग ते नेतील नावे कसे ?
त्यासाठी जगतीं हवेत बहुधा व्हाया महात्मे पिसे

मी साधारण एक पामर तया सामान्य लोकांतला
होतो वंचक हें जरी मज कळे, आलिंगितों रूढिला

आहे जीवन ही विचित्र किमया ना थांग लागे तिचा
त्या वेदांतिल 'नेति नेति' स्मरती येथे ऋषींच्या ऋचा

'सोनें' हें 'विजया' निमित्त कसलें ? प्रेतें कृतींचीं म्हणा
झाली तात्त्विकता…परंतु अपुल्या हातीं असे भावना

भावाचा परिपोष फक्त हृदयें लागूं बघाया जधीं
तत्त्वज्ञान पळेल रुक्ष दुर अन् ये भव्यता दिव्यधीं

दिव्यत्त्वांतुनिया अशाच स्फुरतें नाविन्य विश्वीं खरें
'विश्वप्रेम' म्हणून ज्यास म्हणती यांतूनची तें स्फुरें

* * *

'सोनें' अर्पण हें असो ! करुनिया घ्या गोड याला मुदें
वाढो स्नेह अपार, किल्मिष मुळी कोठेच राहूं न दे

स्नेहज्योत अशीच तेवत सदा राहो अखंडीत ही
आशिर्वाद प्रभूस मागुं मिळुनी—"आम्ही उजाळो मही!"

वर्धा, ११.१०.५०

# २४. सेवा

जीवनकलहामुळे जगाचें
जीवन दुस्तर आज जाहलें
चिंता विपदा या सगळ्यांचें
अवनीवरती राज्य पसरलें १

संघर्षाचा काळ आजचा
देत तडाखे जिवाजिवाला
झंझावातौघामध्ये कुणि
ठेवुं शके नच स्थिर स्वताला २

प्रत्येकाला विचार अपुला
कुठे समष्टी, विश्वप्रेम तें ?
मानवता तर लयास गेली
तुटलें बंधुत्वाचें नातें ३

न ये कोठुनी ध्वनि शांतीचा
पण युद्धाचे वाहे वारे
नांव ऐकतां जरा रणाचें
जगास साऱ्या भरें कांपरें ४

अंतर्मन पण व्यक्तिव्यक्तिचें
आज इच्छितें प्रेम, बंधुता
सहानुभूति, शांति, दिलासा
यांची सकलां आवश्यकता ५

अंतःकरणाच्या ऊबेला
आसुसलेलें विश्व आजचें
उबग तयाला धकाधकीचा
नको नांव पण त्या युद्धाचें ६

परिस्थिती ही पालटण्याला
असंख्य सेवक आज पाहिजे
करावयाला हवें तयांनी
महान मंथन अन् सेवेचें ७

नित्य तयांच्या दृष्टीपुढती
नाचत, तरळत सदा असावा
शब्द एकची मंत्रासम हा--
'सेवा!' 'सेवा!' 'मानवसेवा!' ८

वर्धा, २६.१०.५०

# २५. नव्या उमेदी अन् आशा

लोपल्या तारका काळ्या मेघांआड
उतरला सुधांशु अस्ताचलापल्याड
मज नव्या उमेदी अन् आशा दिसतात
त्या मंदिरांतल्या मंद क्षीण पणतींत

गडगड करुनी मेघ निर्मितात भय
भेसूर ढगांचें हसणें होत असह्य
मज नव्या उमेदी अन् आशा दिसतात
मम छकुल्या बाळाच्या मंजुळ हास्यांत

म्हातारा टेकित काठी, खोकत चाले
सांगतो प्रभूला "नेरे! वय मम झालें!!"
मज नव्या उमेदी अन् आशा दिसतात
मम छकुल्याच्या त्या तुरुतुरु पदचालींत

करि आत्मघात कुणि कंटाळून जिण्यास
कुणि लावुनि घेती गळ्यास अपुल्या फास
मज नव्या उमेदी अन् आशा दिसतात
मम प्रेमिजनांच्या सात्विकशा प्रेमांत!

कळंब, ८.११.५०

## २६. आस

पुढे पाउलें टाकण्याला दयाळा
सदा स्फूर्ति नी धैर्य देई मला
रथा रेटवाया पुढे जीवनाच्या
प्रभो ! शक्ति राहो तुझी पाठिला

नको 'देव' व्हाया कधी जीवनीं मी
करी फक्त मातें खरा 'माणुस'
नको मुक्ति वा सौख्य स्वर्गांतलें तें
नको कल्पनारम्यता ती मज

कधी मूर्तरूपास जीं ना जगीं ये
न तींही मला उच्च ध्येयें दिसो
परी अंतरींची प्रभो ! प्रेमगंगा
सदासर्वदा वाहती ही असो

नको दारवंटा मला पाहणें तो
जया श्रेष्ठ 'अव्यक्त' संबोधिती
सदा व्यक्तअव्यक्त एकांत पाहों
नि प्रवृत्तिनिवृत्ति साधो युति

पुढे जात त्याच्या करातें धरावें
चलावें करा मागुत्या देउनी
तुटावी न ही शृंखला उन्नतीची
स्फुरे नित्य ही आस माझ्या मनीं

कळंब, १०.११.५०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे स्वकमत
अनुक्रम 20550 दि. 3/4/...
क्रमांक 93... नोंः दिः 9/...

## २७. तुझ्यामाझ्या मीलनाची

तुझ्यामाझ्या मीलनाची
कधीच न सरो रात्र
दोघां दूर करणारा
उगवो न केव्हा मित्र १

तुझ्या मीलनसमयीं
थांबो काटे घड्याळाचे
कधी कधी न ते हालो
आणि न चालो जागचे २

तुझ्यामाझ्या मीलनाचा
टिको सर्वदा उन्माद
चिरकाल देत राहो
तोच माझ्या मना मोद ३

तुझ्यामाझ्या मीलनाची
गोडगोड ती खुमारी
निर्मो माझ्या शरीरांत
नित्य नवी शिरशिरी ४

तुझ्यामाझ्या मीलनाचे
श्वास उन्मादक, उष्ण
करो माझ्या हृदयांत
नित्य नर्तन, स्पंदन ५

तुझ्यामाझ्या मीलनाचे
स्पर्श गोड हळूवार
आठवितांक्षणी काटा
उभा राहो अंगावर ६

तुझ्यामाझ्या मीलनाच्या
कधीच न विरो स्मृति
विरहांतहि मग मी
संपवीन काळराती ७

तुझ्यामाझ्या मीलनाचें
स्वप्न कधीच न भंगो
मन स्वप्नसमाधींत
एकतानतेने रंगो ८

कळंब, ४.३.५१

# २८. चढूं या चला उन्नतीचा गिरी

पथीं येति आपत्ति, चित्तीं अशांती न निर्माण होऊंच देऊं कधी
करूं कोट छातीस नी वार झेलूं, न थांबूं कचोनीहि मार्गामधी
पणीं प्राण लावून शौर्यें नि धैर्यें लढूं जीवनाच्या यया संगरीं
पुढे पाउलें टाकुनी फुंकुनीया चढूं या चला उन्नतीचा गिरी

जगाचें जिणें आज झालें उणें हें जणूं शोष सर्वांकडोनी तया
'स्व'च्या भोवती घालती फेर सारे, कुणी ना कुणाला विचारावया
सतावीत संग्राम हा जीवनाचा सदा जेर साऱ्या जनांशीं करी
परी डावलूं याजला युक्त पंथें, चढूं या चला उन्नतीचा गिरी

चला एकमेकांस देऊं दिलासा, न थारा निराशेस देऊं जरा
न मागे वळोनी बघंया जरासें, कशाला उगी शीण द्यावा शिरा ?
असो एक धुंदी, न हो चाल मंदी, जडो दृष्टि एकाच बिंदूवरी
मधी रोख त्याचा कधीही न सोडूं, चढूंया चला उन्नतीचा गिरी

जया जीवनाशीं न ये भांडतां तो बने जीवनापासुनी विन्मुख
असा आत्मवादी करी आत्महत्या जगेना, रडे, त्या मिळेना सुख
अशा या विचारप्रणालींतुनीया समाजास ये खालची पायरी
नको तें कराया कधी आपणाला, चढूं या चला उन्नतीचा गिरी

नागपूर, १८.६.५१

## २९. 'च्या'ची तल्लप करते घाई !

सकाळ होतां पह्यलम् सुट्टा
'च्या'ची तल्लप करते घाई !
सडासारवण तसेंच ठेवुन
इस्तु पेटवी घरची बाई

बूड घेतला जर्मलचा गंज
खदखद गाणें गाऊं लागे
चुलमट घू घू धुव्वा सोडी
करी फुंकणी फूं फूं संगे

कुठे कपबशा, गिलास, भांडीं ?
(कमी न मडक्यांच्या उतरंडी! )
चुलीसमोरच चिमी चिमुरडी
भल्या भदाड्या दगड्या मांडी

लेंढारहि ती चिल्यापिल्यांची
बोंबलते, "दे, मा व मले च्या"
जवळ चुलीच्या घांगर्डांधिगा
साथ आंधणा मिळते 'च्या'च्या

खोकत तुटकी बाज सोडुनी
चूल जवळ करि पोरांचा 'बा'
मारि निव्यावरि पेटवुनीया
थुटचा बिडीचा झुरका लंबा !

पुडीमधिल दो पैसेवाल्या
बुकनीचा तो काळा काढा
भेलीमधला गुळचट गूळ···
पांचट?···ऊं···चवचर्चा सोडा!

मान हालवित डग्डग् बुढ्ढी
येते तेथे वागत वागत
गुळुणी पाणी पितां गरम तें
लाटा फुरफुरती दगडींत

*

परंपरेची कांदाआंबिल
झाली त्यांची हकालपट्टी
यंत्रयुगाचा आला 'च्या' हा
घराघरांतुन खेडोपाडीं

*

सकाळ होतां सुचे न कांही
खाया दाणा घरांत नाही
तरीहि—
उठतां पह्यलम् सुट्टा
'च्या'ची तल्लप करते घाई !

नागपूर, २.३.५२

# ३०. मीलन ! मीलन !!

आसुसलेल्या नेत्रांमधली
मधुर तरल ती मादक मृदुता
भाव निराळे तींत विलसती
मागत कांही ती उत्सुकता

धडधडत्या हृदयास लागली
ओढ अनोखी अन् आकर्षण
प्रीतीच्या कैफांत येउनी
मागतसें तें–"मीलन! मीलन !"

*

प्रीतीची चाखतां माधुरी
तृप्तीचा आनंद लाभुन
क्षणामात्रची ओढ लोपते
मागे पडतें अन् आकर्षण

मीलनांतला रस उन्मादक
समाधान दे स्वर्गसुखाहुन
एकरूपता अनुभवतांना
वाटे––"झालें कृतार्थ जीवन !"

*

मीलन सरतां क्षणीं पुढचिया
अननुभूत अन् हवीहवीशी
विरक्ति येते नवीन न्यारी
गूढ गुदगुल्या हो हृदयाशीं

क्षणामागची एकरूपता
अनुभव घेते विलगत्वाचा
मीलनांतला सात्विक ठेवा
गमे गवसला अपूर्व ऐसा !

*

तरी परंतु न ओढ संपते
कमी न होई अन् आकर्षण
इच्छितसें तें पुनः मागुतें—
'हवेंच तें पण—मीलन ! मीलन !'

नागपूर, १४.३.५२

# ३१. ओढ दोन्हींची कां ?

मुखडा कोमल फुगीर कपोल
लालसर ओठीं स्पंदन विलोल
सुमधुर हास्य ओठांवर खेळे
कुं द क ळी यां चे आंत चाले चाळे

बालिश रुचिर खेळकर भाव
मुखीं विलसती, कलिका की नव !
वात्सल्य उफाळे बघतां बालिका
मुक्यांचा होतसे तिज त्रास मुका !

*

कलिका उमले फूल रसरसे
भावरम्य हास्य अधरीं विलसे

त्याच अधरांचें प्राशण्या अमृत
उत्सुक अधीर ओठ पुढे होत

आनंदी वेदना लाजऱ्या मुग्धेस
चुंबनांनी होई फूल कासावीस

*

कालचा जो 'मुका'
आजचें 'चुंबन'
ओढ निराळी कां
दोन्हींचीहि पण ?

नागपूर, १८.३.५२

## ३२. जगांत उलटी रीत चालते !

जगांत उलटी रीत चालते
ओलें अन् वाळलेंहि जळतें
खऱ्यास खोटें, खोट्यास खरें
गोंडस नामाभिधान मिळतें १

सुंदर आवरणाच्या वरती
संभावित छाकटी झिल्लई
बरबटलेली आंत घाण अन्
कुकृत्यांची घिसाडघाई ! २

"चालणार हें असेंच जगतीं
आताचें जग असेंच आहे
नव्या जगाचा महिमा हा हो!
उपाय त्याला आहे काय ?" ३

संभावित दांभिक धेंडांच्या
शब्दांचा हा बघा 'बझार' !
पोळी ह्यांची सदाच पिकते
निरपराधियांच्या सरणावर ! ४

सत्यम् शिवम् नि सुंदरमाच्या
पकडुनि जाती कासेला जे
दांभिक त्यांना पिचुन टाकती
रक्त तयांचें पितात ताजें ५

नांवें त्यांचीं पुढे गाजतीं
कीर्ति तयांची दासी होते
पैसा सेवेमधे उपस्थित
उणें न केव्हां कोठे पडतें ६

अन्यायाची मिरास जगतीं
न्यायाच्या नांवावर खपतें
जगांत उलटी रीत चालते
ओलें अन् वाळलेंहि जळतें ७

नागपूर, २६.३.५२

## ३३. "कुणी न माझें ! मी न कुणाचा !!"

"कुणी न माझें ! मी न कुणाचा !!"

दूर चालला त्यागुनि सारें
व्यक्त जगाच्या पल्याड पार
सोहं ध्वनिचा थांग लावण्या;
असे महात्मे पूर्वी म्हणती—
"कुणी न माझें ! मी न कुणाचा !!"

जया न ठावें वेद, पुराणें
धर्म, मतांचा नच अभ्यास
देव, ऋषींचा जया न ध्यास,
आध्यात्मिक वा थोर महात्मा—
नसे; असेल साधा मनुज;
काढुनिया तो असेच बोल
जगीं उद्याच्या म्हणेल खास—
"कुणी न माझें ! मी न कुणाचा !!"

यं त्र यु गा चा दास मनुष्य,
देइल ताप जी व न क ल ह,
वृद्धि अमाप बेकारित ती,
न मिळे कोणा काम पुरेसें
कामावर ना जळेल पोट !
कु टुं ब प्र था मो ड क ळी ल;
खंड होउनि ए क ए क टा
ज गा व या ची हौस करील;

काढुनिया तो असेच बोल
जगीं उद्याच्या म्हणेल खास—
"कुणी न माझें! मी न कुणाचा!!"

परिस्थितीने कुटुंबातुनी
पोर फुटोनी उद्या निघेल;
नित्य निराळा राहुनिया तो
पोट आपुलें भरूं पाहिल;
काम! काम!! तें किती करावें?
—उपसा ढीग तरी सुखाचें
जीवन त्याला न लाभणार;
एकटाहि तो कंटाळुनिया
जगीं उद्याच्या म्हणावयाचा—
"कुणी न माझें! मी न कुणाचा!!"

वडील धाऱ्या वडचा माणसा
व्याप घराचा सांभाळेल न;
मुलें, बायको यांच्यावरती
सदा चिडेल; सदा भांडणें.
दोरी ताणत असतांनाच
मधे तुटेल; फुटेल स्फोट.
अन् दुःखाने काढुनि बोल
जगीं उद्याच्या ओरडेल तो—
"कुणी न माझें! मी न कुणाचा!!"

प्रश्न मुलींचा कठीण ऐसा
दाविल भीति सदा पालका;

नोकरींत त्या अन् चतील;
'लग्न जिण्याला शोष लावतें'
त रु णा ला गीं उद्या गमेल;
विवाहास तो देउनि चाट
'चलो एकला' सांगेल मना,
काढुनिया अन् असेच बोल
जगीं उद्याच्या म्हणेल तोहि—
"कुणी न माझें! मी न कुणाचा!!"

विश्व उद्याचें जाईल पुढें;
मान्य; परंतु न्यून राहिल;
ऐकूं येतिल सर्वत्र ध्वनि
आर्त जिवांचे श्रांत मनांचे;
"प्रेम! प्रेम!!" त्या येइल ऊत;
प्रे मा ला गु नि स्वी का रु नि या
मौज लुटाया तोटा ना, पण—
वि वा ह ब द्ध हो ण्या क रि ता
तयार कोणी नच होइल;
स म र्थ नें हि दो घां क डु नी
गोंडस ऐशा श ब्दां म धु नी
ऐकूं येतिल; पुढें हळूच
अन् तो सुद्धा का ढ णा रे गे
जगीं उद्याच्या असेच बोल
"कुणी न माझें! मी न कुणाचा!!"

नागपूर, १.४.५२

## ३४. ब्रह्म थाळींत ठाकलें !

दिसे न मजला केव्हा । ब्रह्म 'ब्रह्मां'त तें मुळी
नांवाचेंच गमे खास । फक्त सारें विडंबन

वेदान्ती ऋषि मोठाले । तत्त्वज्ञ कवि लेखक
तें सर्वदा पळे दूर । ह्या सान्यांस बघोनिया

जेवावयास मी जेव्हा । पाटाच्यावर बैसतों
छान शाल्योदनयुक्त । अन्न थाळींत येतसे

होतो मोद मना मोठा । दर्शनें भोजनाचिया
'अन्न-ब्रह्म' वदे गीता । म्हणूनी न परंतु तो

पाहतां पुढे अन्न । मातें मूर्ति दिसे दुजी
किसान अन्ननिर्माता । अन्नामध्ये मला दिसे

दिसे कृषक अन्नांत । किसानांत ब्रह्म दिसे
पोसणारें गमे विश्वा । ब्रह्म थाळींत ठाकलें !

नागपूर, १८.४.५२

# ३५. पांत

घुक्क अंधारांत नांदे भीति शांती ही किती !
रातव्याने चालली ही पांत मेढीभोवती

त्याच त्या गोलांत घाली बैल फेऱ्या त्या किती!
'तेंच तें कंटाळवाणें ! ' ना इथे त्याची क्षिती
श्रांत बैलांचीं कशीं पोटें खपाटीं लागलीं
ना मिळे खाया धन्याला शक्ति नाही राहिली

हाकतो घेऊन काठी बैल वेगाने तरी
ना करावें तों उद्या फाके पडे सर्वां घरीं
बैल नो माणूस दोघे एक मालीकेंतले
राहिलें नाही जिणें थोडें किसाना आपुलें

गंज 'च्या'चा ह्या इटूल्यांतील आगोटीवरी
ढोकुनी पुन्हा सुरूं तें, दूर राहे ती पथारी
श्रांत चित्ता शांतवाया गीत मध्ये हो सुरूं
चाहुला चोरांचिया ये, लागतो देवा स्मरूं

पाहटेच्या आंत व्हाया पाहिजे सारी तळी
त्याचसाठी रातव्याने पांत आहे चालली !

नागपूर, ४.५.५२

## ३६. तुझ्या वक्षस्थळावर

तुझ्या वक्षस्थळावर
मला पडून राहूं दे
तुझ्या हृदयाचा छंद
माझ्या अंतरा ऐकूं दे

तुझ्या वक्षस्थळावर
डोकें माझें विसावूं दे
मनस्ताप, क्षोभ, व्याधि
येथे दूर घालवूं दे

तुझ्या वक्षस्थळावर
डोळे मिटून पडूं दे
स्वप्नें डोळस पाहोनी
रंगवीत उभवूं दे

तुझ्या वक्षस्थळावर
मला जीवन जगूं दे
जगा हवें तें न मला
जगावेगळें वागूं दे

तुझ्या वक्षस्थळावर
मला संयम साधूं दे
सख्या तुझ्यामाझ्यासाठी
कांच अभंग राहूं दे .

नागपूर, ४.८.५२

## ३७. भिकार–जेवण !

किसान कोणी कष्टार्जित धन
खर्चुनि घाली भिकारजेवण
थाट शिरा-पोळचा यांचा अन्
खूष भिकारी सेवुनि अन्न !

*

रिवाज आणिक मान म्हणून
बोलविले गावचे बडे जन
थोडें खाउन, अर्धे टाकुन--
उठले; वदले "भिकार जेवण!"

नागपूर, २४.४.५३

# ३८. माझा सुखाचा संसार

माझा सुखाचा संसार
राहो असाच सदैव
आहे त्यांत संतोषी मी
नाही खोटी फुकी हाव

नको देण्याघेण्यासाठी
शेजारणीकडे खेटे
आंग घासावया वज्री
वस्त्रें धुवावया रिठे

तांब्यापितळेचीं भांडीं
नको श्रीमंतीचा थाट
चवदार जेवणाला
मडक्यांची उतरंड

कामीं रत; आठवण--
न ये पुरणपोळीची
चवी चाखावी न्यारीच
आंबाडीच्या भाकरीची

सये ! माझें सुखी घर
मुलांबाळांनी भरलें
नित घोंगडी राकट
प्रीत भर्ताराची फुले

नागपूर, २९.४.५३

# ३९. मुक्तात्मा

जिण्याच्या रणाच्या खुणा तोच जाणे जनांच्याचसाठी जळे जीवनीं
जगावेगळा राहुनीया जगाचा, जनींचा जगन्नाथ पूजी मनीं
स्वयें जागता, जागवीता जगाचा, परांचा प्रणेता पुढारी पुरा
ल्चांडांमधे लिप्त ना लौकिकाचा सरींच्या जलीं–उत्पलीं भिन्नता

पहावें पुढे, पातक्यां उद्धरावें, स्मरावें पतीतांचिया पावना
पटे आपणा तें जना सांगतांना सदा शुद्ध वाहे मनोभावना
अहंकार मारून निष्काम कर्मास आचारण्याला सदा मोकळा
जरी जीवनीं वागतो बावळा तो, परी अंतरामाजि नाना कळा

तयाच्या मनाच्या पुढे सिंधु हारे, भिये धीर पाहून त्याचा नग
विषें विश्विचीं प्यायला कोळुनीया, पळे दूर त्या पाहतां पन्नग
भिऊनी तया मृत्यु जाई पळोनी, स्वयें हाच आलिंगितो मृत्युला
जगा जिंकण्याला पुरे शब्द त्याचा, न तेजास वाणीचिया ती तुला

उफाळे वरी स्फूर्ति नी शक्ति, घालूं बघे खोळ आकाशिच्या मंडपा
न त्या मोद साध्यांत, ना खेद केव्हा जरी जाहली शक्ति कोणी खपा
खरा मुक्त आत्मा, पडे बंधनीं ना, अडेना कुणी आड आला जरी
परी प्रेम देऊन बांधा गळां दोर, खाई मुदें तेथली भाकरी

नागपूर, २४.६.५३

# ४०. तुला तेथ मी पाहतों ईश्वरा !

सदा शुक्र जागे जया पाहुनीया
श्रमें लाजवी आणि जो भास्करा
पठारावरी पीक काढून दावी
जयाच्या प्रयत्नें नटावी धरा
विसावा मिळे राम कामांत गातां
मुदें हाकतां हाकतां नांगरा
मना मोहवी मूर्ति शेतांतली ती,
तुला तेथ मी पाहतों ईश्वरा !

झिजे जीवनीं जो जनांच्याचसाठी
सदा घेउनीया तयांची धुरा
न वारा कधी आळसाचा शिवे ज्या
सदा व्यस्त कर्मांत योगी पुरा
स्वयें सेवकाचें जिणें जो जगोनी
दुज्यांना वदे, "आर्तसेवा करा"
प्रभूतें स्मरोनी वरी सेवकत्वा,
तुला तेथ मी पाहतों ईश्वरा !

जयाच्या लिखाणांतुनी लाख लोकां
सदा स्फूर्ति, संदेश लाभे खरा
पुढिव्या गिरा ज्यांत जीवंत ठाके
जयामाजि वाहे जिव्हाळा-झरा

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ८०९५

जयांतून भव्यत्व दिव्यत्व न्यारें
स्फुरोनी बघे लंघण्या अंबरा
जया विश्व दे आदरें मान मोठा,
तुला तेथ मी पाहतों ईश्वरा !

दारिद्र्य-भूषा जया भूषवीते
न ज्याला हरीच्याविना आसरा
सदा ज्ञानदानांत जातां जिणें तें
समाधान ज्याच्या मिळे अंतरा
करी शिष्य कष्टें स्वतांहून मोठा
करोनी स्वयें भावनांचा चुरा
गुरूचें अशा चित्र देखोनि डोळां,
तुला तेथ मी पाहतों ईश्वरा !

जिथे सृष्टिसौंदर्य स्वर्गीय नांदे;
जईं शोभवी इंदु धौतांबरा;
वनीं पाहतां नाचतांना मयूरा
पिसारा मना मोहवी साजिरा;
फुलांचा फुलोरा; खगांच्या विहारा;
वनींचे पशु; श्रेष्ठ नारीनरा
तुझा हा पसारा अवाढव्य सारा !
तुला त्यांत मी पाहतों ईश्वरा !

नागपूर, ५. ८. ५३

# ४१. सेवकाचें हृद्गत

लाखोंना पथि लावण्यास कथितो जो बोल चित्तांतुनी
त्याचा त्रास करावयास कमती होईन दूरध्वनि
गंगौघासम जो पुढेच पळते अर्था अती घेउनी
बोटां त्रास जिच्यामुळे न मुळि हो होईन ती लेखणी

साधी पाउलवाट पायतळिं घे जाण्यास दीनगृहा
काटे सारुनि कंकरांत पडण्या होईन पुष्पें पहा
न्यायार्थी झगडा करीत असतां जातां तुरुंगामधी
तेथे पायधडी बनून रज ते सेवीन जे त्या पदीं

विश्वाची करितो बसून उटजीं जो काळजी अंतरीं
आशेचे कर खेळवी तमिं अशी होईन ज्योती तरी
अंधारामधुनी जगास सुख वा जो द्यावया चालला
तेथे होउनि काजवा लघु, पथा दावीन, जो साधला

*

सेवेचें व्रत चालवीत असतां यो मृत्यु, पायीं बिड्या
सेवाकंकण हें तुटो न, जरि हो देहाचिया चिंधड्या !

नागपूर, १९.१०.५३

# ४२. वेळवाच्या रांजींतला

वेळवाच्या रांजींतला
गार वारा झोंबे अंगा
वाट पाहूं किती सख्या
आतुरलें तुझ्या संगा

खट्याळ हा वारा बाई
अंगावरी आणी काटे
पायीं खालून रानिचे
हृदीं विरहाचे रुते

डंवरल्या बांधावर
उभी राहूं किती वेळ
वाजवी ना हळूवार
गड्या तुझी गोड शीळ

रात आरास मांडते
आकाशींच्या फुलवाती
प्राण डोळ्यांत आणून
उभी घेऊन आरती

भय वाढवी जिवाचें
आडरानींचा अंधार
अंत पाहूं नको आता
होई प्रकाश ! आधार !!

गया ते मोगलसराय रेल्वेप्रवास, २६.२.५४

## ४३. तुला न माझी कळेल कविता !

समस्त विश्वा उरीं कवळुनी
उरण्याइतपत अमर्याद तूं
अपार किमया वर्णन करुनी
न पार तव वेदास परंतु

कुठे कविट्ला पामर मी मग
तुज कवितेमधि समावणारा !
वेडा शब्दाक्षरें जुळवुनी
तुजवर रचतों क्षुद्र पसारा

तुझीच घेउनि तुजजवळोनी
तुझीच कविता तुला समर्पण !
काय घेउनी काय दिलें तें ?
कळे न कांही मजलागी पण

विश्वा निर्मुनि अलिप्त असतो
विश्वाचा तूं नियमनकर्ता
स्तुतिप्रिय न तूं (?) वेडपांघऱ्या
तुला न माझी कळेल कविता !

नकोच पण ती कळावयाला
कळेल तर तूं 'तूं'च राहशिल
तुजवरची अन् तुझीच कविता
ठरेल खोटी, ब्रीदहि जाइल !

नागपूर, १६.६.५४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 20590 वि: ...
क्रमांक ... नों: दिः ...

## ४४. प्रेमकहाणी

हिवताळयाच्या तोंडीपाशी
जवार सळसळली रानांत
नवतीचा भर तल्लख ताजा
रसरसला पानापानांत

मंद उसासे जवानींतले
नवी पोटरी टाकित निसवी
लपतछपत मागून येउनी
हळूच तिजला अनिल हासवी

लाजत मुरकत जवार नाचे
मादक मस्तीमधे रंगुनी
ओहळ अपुली साद मंदवी
नको जावया समाधि भंगुनि

भांगाजवळिल भूशय्येवर
घडते आहे प्रेमकहाणी !
काव्य तयामधि निसर्ग ओती
लिहुनी प्रशान्त वातावरणीं !

कळंब, २५.१०.५४

## ४५. येथेच तूं येशील ना ?

मला भेटशील सख्या
सळसळत्या शेतांत
श्रमामध्ये रतलों मी
तेव्हा येई अकस्मात !

पूजेसाठी सख्या ! तुझ्या
गेली कपाशी फुलून
तुझ्या फराळाला गड्या
हुरडा नि शेंगा छान !

येशील तूं तहानेला
मधु-मोहळ देईन
कांदाभाकरी जेवतां
येई देवा भुकेजून !

रातीं रूपें वराहाच्या
मज येऊन जागवी
कर्तव्यांत खंड नको
मज परीक्षा देववी !

सरलेल्या घडीपाशीं
येथेच तूं येशील ना ?
जीवनांत साधलें जें
त्यांत अर्पूं दे जीवना !

कळंब, २५.१०.५४

# ३६. पुरांत पडले दोन ओंडके

पुरांत पडले दोन ओंडके
सोबत असती कांही वेळ
मधे कुठेही तुटते मैत्री
हेंच आजचें 'प्रेम' असे !

व्यासपीठ गाजतें–वाजतें
बड्या बड्या बातांची हव्वा
कशालागि पण पुसा कृतीला ?
ह्याचें नांव म्हणे 'सेवा !'

वैषम्याला पोसुनि अंतरिं
समतेचा गर्जतोय् डंका
भातकढी खाणें बोलांची
हीच आजची 'माणुसकी !'

सद्भावाने कार्यें करती
पाय तयांचे मागे ओढिति
निष्क्रियतेला काम हवें ना ?
कार्यरीति ही आज दिसे !

मुंगीइतकें काम करावें
गाजावाजा नगाएवढा
'मागे आम्ही नसूं जगाच्या !'
प्रगतीचा केवळ डंका !

कळंब, २५.१०.५४

# ४७. कळुं तर दे मज माव तुझी

कळुं तर दे मज माव तुझी !

उठाठेव करुनी जग केलें
मैदानीं मनुजांस सोडलें
दिली जुंपवुनि कशास झुंजी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

मखमालीवर एक पहुडला
दुजा राहतो खाउनि पाला
सदया ! काय दया ही तुमची?
कळुं तर दे मज, माव तुझी !

कमावणारा पोट बांधतो
बिनकाम्या लंबोदर होतो
हीच तुझी समदृष्टि नि मरजी?
कळुं तर दे मज माव तुझी !

जीवनरस जे जगा पुरविती
धनधान्यांची वर्षा करिती
कां नच मिळतें त्यांना कांजी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

म्हणे उदारांचा तूं राजा
धावतसे दीनांच्या काजा
कां दीनावर मग इतराजी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

बडे मूळचे बडे राहती
सान विचारे पिचतच जाती
की गणितो त्यां सस्ती भाजी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

पाप्यांचे वाढतात मजले
विलासियांचे वाडे सजले
त्यांच्यावरती तूं कां राजी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

तुझे होउनी तुज आठवती
तुलाच धरिती, पाठ पुरविती
त्यांची तूं कां उडवी धज्जी ?
कळुं तर दे मज माव तुझी !

कळंब, २६.१०.५४

# ४८. सुकृत

श्रेष्ठांचा सहवास लाभण्या
सुकृत मोठें गड्या ! लागतें
काय देउनी काय घ्यायचें
कळण्याला पण पुण्य हवें तें !

घेतल्यांतलें काय वगळणें
कठीण आहे गड्या ! समजणें
जरी समजलें तरी उमजणें
त्याहुनि जड अन् कृतींत येणें

श्रेष्ठांचा लाभला प्रसाद
सांभाळाया कठीण पण तो
प्राप्तप्रसादाचा उपयोग
सहजगत्या केव्हाच न कळतो

कळंब, २७.१०.५४

## ४९. पावसांत

शहारली गारठली
ओलेत्याने उभी राई
स्तब्ध, रेट–रेटोनिया
भेदरोनि उभ्या गायी १

फडफडती कावळे
काटक्यांचें घर ओलें
टपोरिया थेंबोटयांनी
पर पंखाचेहि उले २

टपकत्या पागोळयांचा
अंगणांत पडे सडा
करी चिमण्या बनांत
चिवचिवाट ओरडा ३

थेंबें थेंबें वाढे झड
धारा लागल्या खोपटीं
काम चालेना शिवारीं
पोटें चाललीं खपाटीं ४

पिवळटलीं फिक्कट
जातीं जाळोनि रोपटीं
गेलें पाणी···आलें पाणी
रड दोन्हींत शेवटीं ५

भेदरली जीवनाने
टवटवलेली जाई
मात्र बेडूक डौलाने
डबक्यांत नाचे, गाई ६

नागपूर, ७.७.५५

## ५०. स्वराज्य आलें !

‘स्वराज्य आलें ! स्वराज्य आलें !!’
प्रभातफेरीची ललकारी
घरीं नि दारीं वा शेजारीं
मिळे न श्रमिकां पुरी भाकरी १

प्रकाशझोतांच्या फैरी अन्
बारुदगोळा उडे महालीं
जुन्या कुडांच्या रडचा झोपडिंत
काळोखालागि शांति व्याली ! २

‘स्वराज्य आलें ! स्वराज्य आलें !!’
रडे ओरडे भोंगे कर्णे
भकास खप्पड उदास उटर्जी
पानोळचांवर सुटे पारणें ३

देशभक्त कुणि मैदानावर
स्वराज्य–सूत्रें बके भडभडा
पालामध्ये गळीं उतरतो
येळणींतला अळणी भरडा ४

सूतकताई दो तासांची
गांभीर्याने पडली पार
स्वातंत्र्याचें भूषण का हें–
गांठींचें फाटकेंच लक्तर ? ५

स्वराज्य आलें दिल्लीमध्ये
देशभक्त वा श्रीमंतांचें
हाल न कुत्रा खात आजहि
ग्रामीणांचें — खपणारांचें ६

‘स्वराज्य आलें ! स्वराज्य आलें !!’
प्रभातफेरीची ललकारी
श्रमणाऱ्यांच्या जिण्यांत दुःखद
वाऱ्यावरती विरते सारी ! ७

नागपूर, ७.७.५५

## ५१. गर्द सावली पंख पसरते

आळसलेल्या ऐन दुपारीं
झाड वडाचें देइ जांभया
पारंब्यांच्या देहावरतीं
विसावताती स्वप्निल छाया

हिरव्या हिरव्या शेवाळावर
गर्द सावली पंख पसरते
नील भावना हळूच नाजुक
जलराणीची अन् थरथरते

बावरलेली ऊन विलगते
दरीखालच्या एकान्ताला
शाहरलेला मृद्गंधाने
पीत किरण धुंदीचा पेला

दुधाळ देठांवर पानांच्या
हळूच लागे रेंगाळाया–
श्वासांच्या स्वप्नांची कोमल
मुग्ध, लाघवी, नवथर किमया !

नागपूर, २.११.५५

## ५२. काजळलेले पंख

काजळलेले पंख धरेचे
क्षितिजावरती पेंगुं लागले
किणकिणल्या बांगड्या करांतिल
नाद स्मृतींतिल विरल जाहले

क्षणभर आडोसा कुजबुजला
धडपडलें मन निळ्या उशीवर
हळू थरकली निळी पापणी
ओठांच्या फेनिल लालीवर

मलूल होउनि पडे पाकळी
डागळलेल्या कल्पलतेवर
स्पंदित होतो उगीच अजुनी
भयाणतेचा भकासला उर

अमृतसर–दिल्ली–रेल्वे, १३.११.५५

## ५३. महानतेच्या मुळांत शिरुनी–

महानतेच्या मुळांत शिरुनी
क्षुद्रपणाचे कण हाताशीं
अवडंबर संकल्प-क्रियेचे
दोष व्यर्थ पण दुर्दैवासी

भूक तनूची, ओढ जिवाची
जीवनभरही नाही सुटली
अतृप्तीची तृप्ति न झाली
अतृप्ती तृप्ततेंत उरली

परिच्छेद जीवन-ग्रंथाचा
लिहावयाचा राहुनि गेला
कुणीतरी पण लिहुनी नेलें
नको तेंच कवटाळुनि बसला!

नवी दिल्ली, १५.११.५५

## ५४. विश्वनाथ मी !

जगास भाकर–कांदा देई
उपास माझ्या पोटामधले
माझ्या रक्ताच्या थेंबांवर
जगांत सजले इमले मजले १

रात्रंदिन दुसऱ्याच्या साठी
हाडांचीं मीं काडें केलीं
लक्तर नेसुनि आसू पिउनी
संसारांतिल विषें पचवलीं २

प्रगतीच्या मार्गाने चाले
विश्व आजचें पळापळाला
मंदिर सजलें नव्या मनूचें
दगड मीच तर पायामधला ३

माझ्या घामाच्या धारांनी
नंदनवन विश्वाचें फुललें
धरतीचें मुख मंगलमय हें
माझ्यामुळेच दिसतें खुललें ४

मातीचें मीं सोनें केलें
नंदी माझे हे सांगाती
मींच काढलीं राबराबुनी
खडकांतुनि हीं माणिकमोतीं ५

'ग्रामनाथ!' नच; 'विश्वनाथ मी!'
अनाथ(?) मी; जग सनाथ करण्या
सदा सज्ज सकळांच्या साठी
पळापळाला कणकण जळण्या ६

गर्व वाटतो मला नेहमी
पोशिंदा मी या विश्वाचा
लज्जेने झुकतिल मजपुढती
मजवर चालति ज्यांच्या गमजा! ७

नागपूर, २८.११.५५

## ५५. शिवरांतली शांती—

वाऱ्याचें वाहणें थांबलें
स्थिरावली सळसळ पानांची
मदन तुरीचें खळ्यांत पडलें
कुठेशि लपली रग रानाची १

वावरांतल्या वऱ्हईवरचा
महारूख हा बोलत नाही
लाल गाल फुगवून साजरी
काय गुपित सांगते बोर ही ? २

वासनवेलीच्या देहावर
विसावली छाया हिवराची
खट कुंध्याची बाजुस नाजुक
उशी सशाच्या शुभ्र वुऱ्याची ३

वाऱ्यावाचुन माळोशीवर
कंपित होई दर्भ–पसारा
टेंभुरणीच्या झाडावरुनी
साद घालतो उगीच खिखरा ४

नागेलीच्या पानामधला
प्राशन करण्या पिक लालसर
बावरलेल्या धुंद मनाची
शिवारांतली शांती आतुर ५

नागपूर, ८.१२.५५

# कांहीं शब्दांचे अर्थ

आटणें=वळणें.

आटाळा=धावें; मळा; घराच्या छपराखालील अडगळीचा भाग.

आड=विहीर.

आंवाडीची भाकर=अंबाडीच्या भाजीची भाकर.

इटूल्यांतील आगोटी=तीन विटांनी तयार केलेली तात्पुरती चूल.

इंधन=सर्पण; जळाऊ लाकडें.

इस्तु=विस्तव.

उखिर=मुरमाड जमीन.

उघाड=पावसाळयांतील पाऊस न येणारा दिवस.

उतरंड=एकावर एक रचलेलीं मडकीं.

एरंडेल=खेडयांतील बायकांत एरंडी-च्या तेलानें डोकीं नाहायची पद्धति आहे.

कचोनी=कच खाऊन; भिऊन.

करकचुनी=घट्ट आवळला जाऊन.

कर्दा=शेतकरी.

कवडयांचे पट्टे=कवडयांचे साधे किंवा आरसे मढवून केलेले पट्टे. 'कवडपट्टा' हाहि शब्द आहे.

कसुंडी=तिखट; मिरच्यांची पूड.

कळण्याचे मोदक=कळण्याचे वंड. ( वंड=उंडे )

कालवड=गोऱ्ही.

कासरका, कासरा=बैलांना बांध-ण्याचा दोर.

कुचाटी=मोरपिसांचा गायीच्या दोन्ही शिंगांवर बसवावयाचा अलंकार.

कुंध्याची खट=कुंधा नांवाच्या गव-ताचा शेतांतील लहानसा पडित भाग.

कोलामांचे पाउल-डफ=यवतमाळ जिल्हयांतील 'कोलाम' नांवाच्या जातीचे आदिवासी मोठे डफ व पावे वाजवण्याचें काम गोधनो-त्सव, विवाहसमारंभ इ. प्रसंगीं करतात.

खतदेव=गोलाकार लहान पांच दगड शेंदूर लावून ज्वारीच्या ढिगांत ठेवतात. खत हा शब्द 'रास' किंवा 'ज्वारीचा ढीग' या अर्थानें वापरतात.

खायचें तेल=डोकीस गोडें तेल लाव-ण्याचीहि प्रथा खेडयांत आहे.

खुरें=चांदी; दसऱ्याला सोनें आणि खुरें देण्याची प्रथा आहे. खुऱ्या-साठी ज्वारीचीं पानें वापरतात.

खेती=शेती.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 20880 दि: 3/04
क्रमांक ........ नों: दि: ........

खेदणें=हाकणें.
खोळ=चौकोनी कापडांत थोडी ज्वारी घेऊन त्या कापडाचीं चार टोकें बांधतात. तीं कुऱ्हाडीच्या दांड्यास अडकवतात. ती कुऱ्हाड खांद्यावर टाकून शेतास नेतात. हीच ' खोळ ' होय.
गायकावु=गायक्यास म्हणजे गुराख्यास शोभणारी गठ्ठेदार काठी.
गिलास=ग्लास; पेले.
गुळुणी=गुळाची चव असलेलें.
गोप-गायकी=गुराखी.
घात=हंगाम.
घुक्क=गडद; दाट.
चुलगट=चूल.
चेडें=ओंगणाने किटवलेलें मोठें टोपलें. हें शेतकऱ्यांचें ' माप ' होय.
च्या=चहा.
जर्मलचा=(जर्मनचा) अल्युमिनीयम
जौंजाळ=पाश; जाळें. (धातूचा.
झुंजुरक्याला=दिवस निघण्याच्या सुमारास.
टेंभुरणी=एक झाड.
डोकें पच्ची करणें=अति विचार करणें.
ढोला=मोठी कणगी.
तणस=धानाच्या पिकाच्या ओंब्या काढल्यावर उरलेलें मऊ गवत.
तल्लप=संवय.
तळी=जमीन शिपून केलेल्या गोलाकार चोपड्या खळ्यांतील कणसांचें बैलांच्या पायांनी ' चूर्ण ' (चुरणें) होऊन पसरलेली भुसाभरली ज्वारी.
तळी उफणणें=भूस उडवून ज्वारी अलग करणें.
तासावर पैसे घेणें=कामावरून परततांना नगदी मजुरी घेणें.
तिफण=गहूं-ज्वारी पेरण्याचें तीन टोकांचें अवजार.
तिवा=तिवई; या तिपायीवर उफणणारा माणूस उभा राहतो.
तुंब्या=भोपळा; खेड्यांतील ही ' वॉटरबॅग 'च !
तोडे=बैलाच्या गळ्यांतील पितळी अलंकाराचा एक प्रकार.
तोंडीपाशीं=आरंभीं.
दगडी=एकप्रकारची दगडाची वाटी.
दंडार=टिपऱ्यांचें ग्रामीण नृत्य; ( दंडारी=दंडधारी ? )
धुव्वा=धूर.
धोंगडी=साधीसुधी, रानवट.
नाईक=पाउल-डफ वाजवणारे कोलाम.
नागेली=नागवेली.
निघलों='निघालों' अर्थाचा वऱ्हाडी शब्द.
निंदण=पिकांतील तण काढणें.

निवद=नैवेद्य.

पडित=शेतांतील न पिकणारा गवताळ भाग.

पह्यलम् सुट्टा=पहिल्याप्रथम.

पाटद्या=लहान टोपल्या; परड्या.

पांत=ज्वारीची मळणी करण्यासाठी खळयांत कणसें टाकून त्यांवर बैल फिरवणें.

पानोळया=मोहफळांच्या भाकरी.

पार=देवळाचा ओटा.

पेव भरणें=जमिनींत ज्वारी ठेवण्याचा एक विधि. एकजण 'काय करतो' असा प्रश्न करीत असतो व दुसरा 'पेव भरतों' असें म्हणून मुठीने ज्वारी जमिनींत पुरतो. हीं प्रश्नोत्तरें पांचदा होतात.

पोटरी=ज्वारीच्या कणसांची उमलण्यापूर्वीची स्थिति.

बागत बागत=वाकत वाकत.

बाळणें=जाळणें.

बुकनी=पूड.

बुड्ढी=म्हातारी.

बूड घेणें=जळू नये म्हणून भांड्यास ( माती लावणें.

बोनें=नैवेद्य.

बोलविले=बोलाविले.

भदाड्या=मोठ्या.

भरडा=तुरीचा शिजलेला घाटा.

भर्तार=भ्रतार.

भांग=ज्वारीच्या उभ्या पिकांतून जाण्यासाठी पाडलेली पाऊलवाट.

भेली=गुळाची ढेप.

मजा='मौज' या अर्थाचा वऱ्हाड-नागपूरकडचा शब्द.

मणके=जाड सुतांत गारेच्या नळया अडकवून बैलांसाठी केलेले अलंकार.

मदन=खळयांत पडलेला तुरीचा भुसाभरला पसारा.

मले=मला.

महारूख=एक वृक्ष. ( महावृक्ष )

मळा=पांखरें हाकण्यासाठी व रात्रीं जागल करणाऱ्यास विसावण्यासाठी शेतांत उभारलेला माचा.

मा=आई.

मावास तोडणें=आईच्या अंगावर ( दूध पिणें.

माळोशी=लहान माळा.

मीठाची कांबळ=घोंगडीची घडी खांद्यावर टाकून तिच्या एका खणांत मीठ घेऊन त्यांतील मूठमूठ मीठ गायींना दाखवीत गुराखी पुढे चालतो. मीठाच्या लालचीने गायी त्याच्यामागे जातात.

८०९५

मुडुण=(मुरडणें) शेताची मशागत वगैरे करतांना औत एका बांधापासून दुसऱ्या बांधापर्यंत नेऊन परत पहिल्या बांधापर्यंत आणल्यावर एक मुडुण होतें.

मेढ, मेढी=खळ्याच्या मध्यावर नव्याने तोडून आणून गाडलेलें पळसाचें लहान झाड. ह्याच्याभोवती बैल फिरतात.

मोहाड्या=( मूळ शब्द मोहाडी ) गायींच्या तोंडावर बसविण्याचें कवड्यांचे अलंकार.

म्होतिर=शुभ मुहूर्त.

येळणी=मातीचें पसरट भांडें.

रांजी=राई.

रातव्याने=रात्रींच्या वेळीं.

रिठें=साबणासारखा उपयोग होणारीं खेड्यांतील एकप्रकारचीं फळें.

रुमणें=हातांत धरण्यासाठी वाकडी मूठ असलेला वखराचा एक लहान दांडा.

लचांड=भानगड.

लटा=केस.

लेंढार=ओळची ओळ.

व=वो; अग.

वज्री=कठीण विटेचा तुकडा.

वऱ्हई=शेताच्या कोपऱ्यावरचा खुणेचा दगड किंवा मातीचा उंचवटा.

वावर=शेत.

वासनवेल=सरपटणारा एक वेल.

शिगऱ्या=सुंदर, बांकदार व लांब शिगांच्या.

शिल्या=( ए. व. शिली ) मेंढीच्या केसांच्या रंगबेरंगी माळा.

सये=सखे

सरतें=वखराला दोरीनें बांधलेलें पेरण्याचें नळकांडें. सुमारे ४-५ फूट उंचीचा बास एकीकडून फडकवून केलेलें असतें. ह्याच्या पोकळींतून सरकी सुटते व तासांतल्या मातींत दबते.

सस्ती=स्वस्त.

सिखरा=एक पक्षी.

सुगरण=एकप्रकारच्या गवती काड्यांची केरसुणी. हिचा उपयोग उफणलेल्या ज्वारींतील कणसांवरचें बोंड अलग करण्यासाठी होतो.

हाणणें=हाकणें.

हिवताळा=हिवाळा.

हिवर=एक झाड.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें स्वामित्व.
अनुक्रम २०९९० वि: ३८०५-
८२
क्रमांक ९३८६ नों: दि: १०।१२।७२

REFBK-0009095

REFBK-0009095